महाराष्ट्र जनशक्ती


ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३१० वे | दिनांक : ०७/११/२०२६ | वार : शनिवार

पवार कुटुंबाच्या एकत्र येण्यावर शिवसेनेची प्रतिक्रिया



मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून घडामोडींना कमालीचा वेग आला असून, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांनी पुन्हा एकदा जोर धरला आहे. मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या शरद पवार यांची अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी भेट घेतल्यानंतर राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले आहे. त्यातच अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी "जर अजित दादा हयात असते, तर 12 फेब्रुवारी रोजीच दोन्ही राष्ट्रवादींचे विलीनीकरण झाले असते," असा खळबळजनक गौप्यस्फोट केला आहे. या सर्व घडामोडींवर आता महायुतीतील घटकपक्ष असलेल्या शिवसेना (शिंदे गट) पक्षाची पहिली अधिकृत प्रतिक्रिया समोर आली आहे. शिवसेना (शिंदे गट) नेते तथा मंत्री भरत गोगावले यांनी या संवेदनशील विषयावर अत्यंत सावध पवित्रा घेत, हा निर्णय पूर्णपणे शरद पवार, सुनेत्रा पवार आणि त्यांच्या पक्षातील वरिष्ठ नेत्यांचाच असल्याचे स्पष्ट केले आहे. अजितदादा असताना काय घडलं हे त्यांनाच माहीत दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाबाबत प्रसारमाध्यमांनी विचारलेल्या प्रश्नावर भरत गोगावले म्हणाले, "राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकत्र यायचे की नाही, हा त्यांचा संपूर्णपणे अंतर्गत निर्णय आहे. यावर शरद पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि दोन्ही बाजूंच्या वरिष्ठ नेत्यांनीच बसून योग्य तो निर्णय घ्यावा.“ "अजित दादा हयात असताना बंद दाराआड नेमके काय घडले आणि काय ठरले होते, याची माहिती केवळ त्यांनाच आहे. त्यामुळे त्यावर आम्ही कोणतेही भाष्य करणार नाही. राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणाबाबत आमचे काहीही म्हणणे नाही; त्यांच्या वरिष्ठ नेत्यांनीच याबाबत अंतिम निर्णय घ्यावा," असे सांगत गोगावले यांनी या वादापासून सुरक्षित अंतर राखले आहे. सुनील तटकरेंचा गौप्यस्फोट नेमका काय? विलीनीकरणाच्या चर्चांना हवा देणारे विधान खासदार सुनील तटकरे यांनी केले होते. तटकरे यांनी स्पष्ट केले की, आजच्या घडीला दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाची कोणतीही अधिकृत चर्चा सुरू नाही. मात्र, जर अजित पवार आज हयात असते, तर गेल्या १२ फेब्रुवारी रोजीच दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण होऊन पक्ष एकत्र आले असते, असा मोठा दावा त्यांनी केला. अनिल देशमुखांनी विचारला जाब तटकरेंच्या या विधानानंतर शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांनी आक्रमक होत, "जर दादांच्या काळातच विलीनीकरण ठरले होते, तर गेल्या २ वर्षांपासून कोणाच्या दबावाखाली तटकरे ही गोष्ट लपवून ठेवत होते आणि खोटे बोलत होते?" असा प्रतिसवाल केला आहे. अमित शहांची दिल्ली भेट ते ब्रीच कँडीतील गाठीभेटी; नेमकं काय शिजतंय? गेल्या आठवड्यात झालेल्या राजकीय घडामोडींमुळे राज्याच्या सत्ताकारणात मोठा सस्पेन्स निर्माण झाला आहे. अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ, सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि धनंजय मुंडे यांनी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. या भेटीत पक्ष नेतृत्वासंदर्भात आणि समन्वयाबाबत काही नेत्यांनी नाराजी मांडल्याची चर्चा होती.

१० तारखेनंतर शरद पवारांच्या भूमिकेकडे लक्ष; विलीनीकरणाच्या चर्चांना वेग



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात वैद्यकीय तपासण्यांसाठी दाखल असतानाच, त्यांच्या एका वाक्याने महाराष्ट्राच्या राजकारणात प्रचंड खळबळ उडवून दिली आहे. अजित पवार गटाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल यांनी ब्रीच कँडीत जाऊन घेतलेल्या भेटीदरम्यान शरद पवार यांनी "१० तारखेनंतर बोलू," असा सूचक निरोप दिला होता. या विधानानंतर दोन्ही राष्ट्रवादींचे पुन्हा विलीनीकरण होणार आणि खासदार सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होणार, अशा जोरदार राजकीय चर्चांना उधाण आले. या सर्व घडामोडींवर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी मंत्री जयंत पाटील यांनी थेट समोर येत वस्तुस्थिती मांडली असून विलीनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. "पवार साहेबांची तब्येत आता उत्तम आहे. त्यांच्याशी माझी १० मिनिटे चर्चा झाली. १० नोव्हेंबरनंतर ते अलिबागला एका पूर्वनियोजित कार्यक्रमासाठी जाणार आहेत," असा थेट खुलासा जयंत पाटील यांनी केला आहे. शरद पवार-प्रफुल्ल पटेल यांच्या भेटीवरून रंगणाऱ्या राजकीय समीकरणांवर जयंत पाटील यांनी परखड भाष्य केले. "दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाबाबत शरद पवार साहेबांनी यापूर्वीच आपली ठाम भूमिका जाहीर केली आहे. त्यामुळे पुन्हा एकत्र येण्याच्या किंवा सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होण्याच्या बातम्या केवळ निराधार अफवा आहेत.“ कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघावरील 4 शासननियुक्त संचालकांच्या निर्णयावर ताशेरे ओढताना पाटील म्हणाले, "गोकुळमध्ये सरकारने घेतलेला निर्णय लोकशाहीला मुळीच अभिप्रेत नाही. हा सत्तेचा आणि कायद्याचा थेट गैरवापर आहे.“ पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमधून डिस्चार्ज मिळाल्यानंतर शरद पवारांना नियमित तपासण्यांसाठी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. कालपासून रुग्णालयात राजकीय आणि उद्योग जगतातील बड्या व्यक्तींची रीघ लागली आहे. देशातील बडे उद्योगपती गौतम अदानी यांनी आज सकाळी ब्रीच कँडी रुग्णालयात जाऊन शरद पवार यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनीही रुग्णालयात जाऊन पवारांशी संवाद साधला. काल अजित पवार गटाचे ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ आणि प्रफुल्ल पटेल यांनी भेट घेतली होती. पटेल यांच्या भेटीचे फोटो आणि व्हिडिओ समोर आल्यानंतर आता उपमुख्यमंत्री आणि अजित पवार गटाच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार या सुद्धा शरद पवारांच्या भेटीसाठी रुग्णालयात दाखल होत आहेत. यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः फोन करून शरद पवारांच्या तब्येतीची चौकशी केली होती.

राज्यात तीन ठिकाणी भीषण अपघात; अनेकांचा मृत्यू



सोलापूर : राज्यात तीन वेगवेगळ्या ठिकाणी भीषण रस्ते अपघात झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात शेटफळ ते तेलंगवाडी दरम्यान कार आणि कंटेनरच्या जोरदार धडकेत एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हे कुटुंब आज सकाळी कल्याणहून अक्कलकोटला देवदर्शनासाठी निघाले होते. दुपारी तीनच्या सुमारास कंटेनरला धडक बसल्याने हा अपघात झाला. या अपघातात आठ वर्षांचा चिमुकला पार्थ तुषार भारंबे, विलास चांगू भारंबे (वय ६६) आणि शोभा विलास भारंबे (वय ६३) यांनी जागीच प्राण सोडले. तर तुषार विलास भारंबे आणि पूनम तुषार भारंबे हे दांपत्य गंभीर जखमी झाले आहे. जखमींना पुढील उपचारासाठी तात्काळ शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले असून या दुर्दैवी घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. दापोली एसटी बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावर सायंकाळी पाचच्या सुमारास आणखी एक भयंकर घटना घडली. कोळबांद्र येथून दापोलीकडे येणाऱ्या एसटी बसच्या (एमएच २० बीएल २१२७) डाव्या चाकाखाली आल्याने फातिमा हमीद जोगळेकर (वय ६०, रा. खेड) या महिलेचे दोन्ही पाय चिरडले गेले. त्यांना तातडीने दापोली उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून या घटनेमुळे बसस्थानकांवरील प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. जळगाव शहराबाहेर कानळदा रोडवरील पेट्रोल पंपाजवळ कार (एमएच ०५ सीए ३१२३) आणि मालवाहू रिक्षाची (एमएच १९ बीएम १९०४) समोरासमोर जोरदार धडक झाली. दुपारी अडीच वाजेच्या सुमारास झालेल्या या अपघातात रिक्षाचालक इब्राहिम रहीम पिंजारी (वय ३५, रा. उस्मानिया पार्क) हे गंभीर जखमी झाले.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ नोव्हेंबर २०२६

मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाला गती - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) : मराठवाड्यातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवून या भागाला दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाला गती द्यावी. प्रकल्पाचा प्राथमिक प्रकल्प अहवाल तातडीने अपलोड करून केंद्र सरकारच्या आर्थिक व्यवहार विभागाकडे पाठविण्याची कार्यवाही वेगाने पूर्ण करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील वर्षा शासकीय निवासस्थानी जायकाच्या वरिष्ठ शिष्टमंडळासमवेत उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या आराखड्यासह महाराष्ट्र आणि जपान यांच्या सहकार्याने सुरू असलेल्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी (JICA) कडून सुमारे २० हजार कोटी रुपयांचे अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे.चार जिल्ह्यांना पहिल्या टप्प्यात लाभमराठवाड्यातील पाण्याचे असमान वितरण लक्षात घेता अतिरिक्त पाणीसाठा असलेल्या धरणांमधून दुष्काळी भागातील धरणांपर्यंत बंदिस्त पाइपलाइनद्वारे पाणी पोहोचविणे हा वॉटर ग्रीड प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी दुहेरी प्रवाहाची व्यवस्था विकसित करण्यात येणार आहे.प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर आणि धाराशिव या चार जिल्ह्यांचा समावेश असून जायकवाडी, माजलगाव, मांजरा, उजनी, निम्न तेरणा आणि निम्न मनार ही धरणे परस्परांना जोडण्यात येणार आहेत. सुमारे ३ हजार ९५ किलोमीटर लांबीच्या मुख्य व दुय्यम पाइपलाइन आणि १५ जलशुद्धीकरण केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा सुमारे एक कोटी नागरिकांना थेट लाभ होणार आहे.२० हजार कोटींच्या कर्जसहाय्याबाबत जायकाचा सकारात्मक प्रतिसादसंपूर्ण आठ जिल्ह्यांतील वॉटर ग्रीड प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे २५ हजार ५६ कोटी रुपये आहे. पहिल्या टप्प्यासाठी सुमारे २० हजार कोटी रुपयांचे कर्जसहाय्य देण्याबाबत जायकाने सकारात्मक प्रतिसाद दर्शविला आहे. लातूर आणि धाराशिव हे भूकंपप्रवण क्षेत्रात येत असल्याने प्रकल्पाच्या बांधकामात जपानचे प्रगत भूकंपरोधक तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. त्यामध्ये डक्टाईल आयर्न पाइप्स, आधुनिक पंपिंग यंत्रणा आणि SCADA प्रणालीचा समावेश असेल. तसेच छत्रपती संभाजीनगरमधील ऑरिक सिटी, शेंद्रा-बिडकीन आणि वाळूज औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होण्यास या प्रकल्पामुळे मदत होणार आहे.ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स (AVGC) क्षेत्रात महाराष्ट्राला जागतिक स्तरावर पुढे नेण्यासाठी जपानी कंपन्या आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीज (IICT) यांच्या सहकार्याने उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत फेब्रुवारीमध्ये मुंबईत 'मांगा कारवान' आयोजित करण्यात येणार असून, या उपक्रमाचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वागत केले.२०२९ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजनमराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करणे आणि सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याची प्रक्रिया जायकाच्या सहकार्याने तातडीने पूर्ण करण्यात येणार आहे. २०२९ पर्यंत प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले.महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधा विकासासाठी तसेच पाणी, वाहतूक, पर्यावरण आणि आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रकल्पांसाठी राज्य शासन जपानसोबतचे सहकार्य अधिक दृढ करणार असून, सर्व प्रकल्पांना शासनाकडून आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य दिले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन नैनुटिया, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव अमगोथू नाईक, 'मित्रा'चे विभाग प्रमुख डॉ. संजय बेलसरे तसेच भारतातील जपानच्या महावाणिज्यदूत हितोमी सातो, भारतीय कार्यालयातील जपानचे वाणिज्यदूत केन्जी ताकागी, जायका इंडिया कार्यालयाच्या मुख्य प्रतिनिधी ताकुरो ताकेउची आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते

'लेखिकांची कथासृष्टी' पुस्तकाचे उत्साहात प्रकाशन



छत्रपती संभाजीनगर : विवेकानंद महाविद्यालयातील मराठी विभाग आणि प्रगतिशील लेखक संघ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. अर्चना काटकर लिखित 'लेखिकांची कथासृष्टी' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा विवेकानंद सभागृहात संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी विधान परिषद सदस्य तथा एकता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आ. एम. एम. शेख होते. ज्येष्ठ समीक्षक डॉ. सतीश बडवे यांच्या शुभहस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी साहित्य क्षेत्रात बहुमोल योगदान देणाऱ्या ज्येष्ठ लेखिका ललिता गादगे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. केशव तुपे, डॉ. मुख्त्यार शेख आणि डॉ. रेखा मेश्राम यांनी पुस्तकाच्या आशयावर भाष्य केले. स्त्री लेखिकांचे कथालेखन, त्यातून व्यक्त होणारे स्त्रीजीवनाचे विविध पैलू, स्त्रीमनाचे भावविश्व, सामाजिक, कौटुंबिक वास्तव आणि बदलत्या काळातील स्त्रीचे स्थान अशा विविध अंगांनी पुस्तकाच्या साहित्यिक मूल्यांचा ऊहापोह करण्यात आला. स्त्री लेखिकांच्या साहित्यविश्वाचा अभ्यासपूर्ण वेध घेणारे 'लेखिकांची कथासृष्टी' हे पुस्तक मराठी साहित्याच्या अभ्यासकांसाठी आणि वाचकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणारे आहे. स्त्रीवादी साहित्यचिंतनाच्या दृष्टीने अशा प्रकारचे लेखन आणि त्यावरील चर्चा अतिशय महत्त्वपूर्ण आहे असे ललिता गादगे यांनी सांगितले. यावेळी ज्येष्ठ समीक्षक सतीश बडवे यांनी एकूणच कथा वांग्मयाचे लेखन व समीक्षा यावर प्रकाश टाकला.मनोगत व्यक्त करताना लेखिका डॉ अर्चना काटकर यांनी त्यांचे संशोधन कार्य, पुस्तकाची निर्मिती करताना झालेले इतरांचे सहकार्य याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.अध्यक्ष समारोप करताना मा. एम एम शेख यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व आणि त्यांच्या विकासासाठी स्त्रियांना स्वातंत्र्य देणे कसे आवश्यक आहे हे पुस्तकाच्या आणि स्वतः केलेल्या स्त्रीविषयक कार्याच्या उदाहरणातून सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ दत्तात्रय डुंबरे यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अनिता फुलवाडे आणि आभार प्रगटन प्रा. शैला जगदंबे यांनी केले.कार्यक्रमाला संशोधक विद्यार्थी, विविध महाविद्यालयातील प्राध्यापक लेखिकेचे कुटुंबीय आणि रसिक होते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

१.	पूर्ण पान (मल्टीकलर)	५०००/-
२.	अर्धे पान (मल्टीकलर)	३०००/-
३.	पाव पान (मल्टीकलर)	२०००/-
४.	शुभेच्छा जाहिरात	६००/-

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002


महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ नोव्हेंबर २०२६

मानवतावादी विचारवंत डॉ. म.सु.पगारे यांची महामुलाखत व महाचर्चा गुगलमीटवर संपन्न



जळगाव : सुप्रसिद्ध साहित्यिक तथा संशोधक प्रोफेसर डॉ.म.सु.पगारे यांची गुगलमीटवर आयु.प्रज्ञा बागुल घोडेस्वार यांनी महामुलाखत घेऊन विदवत अभ्यासकांच्या उपस्थितीत महाचर्चा आज दि.५ नोव्हेम्बर २०२६ रोजी दुपारी ३ते ५.३० या कालावधीत घडवून आणली. बा, तथागता!हा विशाल काव्यग्रंथ साहित्य क्षेत्रात आणि सोशल मीडियावर विशेष चर्चेचा विषय झाला असून या विशाल मराठी काव्यग्रंथाचे इंग्रजी,हिंदी,अहिराणी भाषेत अनुवाद संपन्न होऊन विदवत ४४ समीक्षकांनी मराठी व अहिराणी अनुवादित बा, तथागतावर समीक्षा लेखन केले असून डॉ.रमेश माने यांनी मराठी समीक्षेचे संपादन,तर प्रा.वा.ना.आंधळे यांनी अहिराणी समीक्षा ग्रंथाचे संपादन केलेय.बा, तथागता! या विशाल काव्यग्रंथाची लोकप्रियता वाचक, समीक्षक व अभ्यासकांच्या मनीअंतरी दृढ होत असून आजपर्यंत या एकाच साहित्यकृतीवर आठ पुस्तके लिहिली गेलीत.त्याच लोकप्रियतेतून सुप्रसिद्ध लेखिका तथा कावयित्री आयु.प्रज्ञा बागुल घोडेस्वार यांनी बा, तथागता! : आकलनाचे प्रज्ञातरंग या समीक्षा ग्रंथाचे लेखन पूर्णत्वास गेल्याच्या आनंदाप्रित्यर्थ आजच्या महामुलाखतीचे व महाचर्चेचे दिमाखदार आयोजन गुगलमीटवर केले होते.अडीच तास चाललेल्या या मुलाखतीत आयु.बागुल मॅडम यांनी कवी प्रा.डॉ. म.सु.पगारे यांना अभ्यासपूर्ण प्रश्न विचारून बा, तथागताच्या अंतरंगाचा परिपूर्ण वेध घेण्याचा प्रयत्न अभिनंदनीय होता व डॉ.पगारे सरांनी त्या प्रश्नांना दिलेली उत्तरे उवस्थितांच्या हृदयस्थ होणारी अशी समर्पक व चिंतनशील होती.अडीच तास चाललेल्या या महामुलाखतीत उपस्थित अभ्यासकांनी महाचर्चेत उत्स्फूर्त घेतलेला सहभाग देखील संस्मरणीय ठरला.त्यात अमळनेर येथील प्रताप स्वायत्त महाविद्यालयाचे सुप्रसिद्ध साहित्यिक तथा समीक्षक प्रा.डॉ. रमेश माने,भुसावळ येथील सुप्रसिद्ध कवी ज्ञानेश्वर घुले,भडगाव येथील सुप्रसिद्ध साहित्यिक व अहिराणीचे अभ्यासक डॉ.वाल्मिक अहिरे,धुळे येथील सुप्रसिद्ध साहित्यिक तथा अहिराणी भाषेचे गाढे अभ्यासक सुभाष नाना अहिरे,जळगाव येथील सुबोध वाकोडे व भागवत सपकाळे यांनी रॅपिड प्रश्न विचारून महामुलाखतीस चांगलीच रंगत आणली. तसेच एरंडोल येथील सुप्रसिद्ध कवी निंबा पुना बडगुजर,एरंडोल येथील सुप्रसिद्ध साहित्यिक ऍड.विलास कांतीलाल मोरे ,एरंडोल येथूनच सुप्रसिद्ध कवी तथा बा, तथागता! अहिराणीचे अनुवादक प्रा.वा. ना.आंधळे यांनी महाचर्चेत घेतलेला सहभाग लक्षवेधी होता. या महामुलाखतीस बुद्धिझमचे अभ्यासक आचार्य महानागरत्न यांच्या प्रमुख उपस्थितीसह डॉ.योगेश महाले,डॉ.ज्ञानेश्वर कांबळे, डॉ. प्रिती सोनी, डॉ.दीपक खरात,प्रा.,महेश सूर्यवंशी, सुकन्या जाधव व इतर अभ्यासकांनी उपस्थिती दिली.संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचलन व आभार प्रदर्शन प्रा.वा.ना. आंधळे यांनी केले.

दिवाळी सण आला

सोनियाच्या पावलांनी
दिवाळी सण आला
प्रकाशाचा उत्सव
साजरा करू चला

अंगणी शोभून दिसे
रंगीबेरंगी रांगोळी
अभ्यंगस्नान करू
उटणे लावून सकाळी

घर दार उजळले
तेजोमय दिव्यांनी
आकाश सजले
लुकलुकणाऱ्या तारकांनी

झगमगणारा आकाशकंदील
दिसे उंच छतावरी
आम्रपानांचे तोरण
शोभून दिसे दारी

विविध पदार्थांची
रिकामी करू थाळी
लाडू, चिवडा,चकली
शेव अन् शंकरपाळी

घर,दार,अंगण
सुखसमृद्धीने उजळो
उत्सवाच्या आनंदात
स्नेहाचा सुगंध दरवळो



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

सहा दिवसीय सीएमईमध्ये डॉ. आशा भोसले यांचा सहभाग; मोतीवाला होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, नाशिकचे प्रतिनिधित्व



नाशिक : महाराष्ट्रातील पालघर येथील डॉ. एम. एल. धवळे मेमोरियल होमिओपॅथिक इन्स्टिट्यूट येथे २६ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान आयोजित सहा दिवसीय सतत वैद्यकीय शिक्षण (CME) कार्यक्रमात मोतीवाला होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, नाशिक येथील होमिओपॅथिक मटेरिया मेडिका विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. आशा भोसले यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून संस्थेचे प्रतिनिधित्व केले.हा शैक्षणिक कार्यक्रम भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या सहा दिवसीय CME मध्ये सहभागी होत डॉ. आशा भोसले यांनी होमिओपॅथिक वैद्यकीय शिक्षणासंदर्भातील महत्त्वपूर्ण शैक्षणिक ज्ञान, नवीन दृष्टिकोन आणि अनुभव संपादन केला. या कार्यक्रमामुळे त्यांच्या व्यावसायिक कौशल्यात आणि विषयज्ञानात अधिक भर पडली.मोतीवाला होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, नाशिकच्या ट्रस्टी डॉ. सहार मोतीवाला सिंग यांनी डॉ. आशा भोसले यांचे अभिनंदन केले. वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी, सातत्यपूर्ण ज्ञानवृद्धीसाठी तसेच प्राध्यापकांच्या व्यावसायिक विकासासाठी अशा शैक्षणिक उपक्रमांमधील सहभाग महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले.डॉ. आशा भोसले यांच्या या सहभागाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ नोव्हेंबर २०२६

जिल्ह्यावर टंचाईचे सावट; २९४ टँकरद्वारे ४.३० लाख लोकांची तहान भागवण्याची धडपड

बीड : (भगवंत पाळवदे) एल-निनोच्या प्रभावामुळे यंदा बीड जिल्ह्यात पावसाने सरासरीपेक्षा मोठी ओढ दिल्याने पाणीटंचाईचे संकट गडद झाले आहे. मात्र, संभाव्य परिस्थितीचा अंदाज घेऊन जिल्हा प्रशासनाने वेळीच पावले उचलत टंचाईविरुद्ध व्यापक सज्जता केली आहे. जिल्ह्यातील गावोगावी टँकरद्वारे पिण्याचे पाणी पोहोचवले जात असून, दीर्घकालीन नियोजनासाठी दुष्काळ व्यवस्थापनाचा सविस्तर मास्टर प्लॅनही तयार होत आहे.*पावसाची तूट*जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ५६६.१ मिमी असताना ३० सप्टेंबर २०२६ अखेर प्रत्यक्षात केवळ ३५६.६ मिमी, म्हणजे सुमारे ६३ टक्के पाऊस झाला. पावसाळ्याच्या उत्तरार्धात परिस्थिती अधिकच बिकट झाली. ऑगस्टमध्ये सरासरीच्या अवघा १८.७ टक्के, तर सप्टेंबरमध्ये ४१.६ टक्के पाऊस पडला. या तुटीमुळे पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने उपाययोजनांना सुरुवात केली.*धरणांतील पाणी केवळ पिण्यासाठी*धरणांमधील पाणीसाठा केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा आदेश १२ जून २०२६ रोजीच काढण्यात आला होता. टँकर मंजुरीचे अधिकार १२ सप्टेंबर २०२६ च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्याने गावांच्या मागणीवर तातडीने निर्णय घेणे शक्य झाले आहे.*१७२ गावे, १८३ वाड्यांना टँकरचा आधार*२ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या स्थितीनुसार जिल्ह्यातील १७२ गावे आणि १८३ वाड्यांमधील ४,२९,८४२ लोकसंख्येला २९४ टँकर आणि ४५ विहीर व बोअर अधिग्रहणांद्वारे पिण्याचे पाणी पुरवले जात आहे. त्यापैकी २५७ टँकर ग्रामीण भागात, तर ३७ टँकर नागरी भागात कार्यरत आहेत. तालुकानिहाय पाहता गेवराई तालुक्यात सर्वाधिक १२५, तर आष्टी तालुक्यात ७४ टँकर सुरू आहेत.*पारदर्शक पुरवठ्यासाठी क्रॉस तपासणी*टँकर भरण्यासाठी जिल्हा परिषदेने ८९ फिलिंग पॉइंट निश्चित केले असून तालुकानिहाय आश्वासित जलस्रोतांची यादीही तयार आहे. पुरवठा पारदर्शक आणि सुरळीत राहावा, यासाठी सुरू असलेल्या सर्व टँकरची उपविभाग बदलून क्रॉस तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.*नवीन बोअरवेलवर निर्बंध*भूजलाचे संरक्षण करण्यासाठी २ नोव्हेंबर २०२६ च्या आदेशाने जिल्ह्यात नवीन बोअरवेल खोदकामावर निर्बंध घालण्यात आले आहेत. यापुढे बोअरवेल खोदण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी बंधनकारक असेल.*ऑगस्ट २०२७ पर्यंतचा मास्टर प्लॅन*जिल्हाधिकारी स्तरावर सविस्तर दुष्काळ व्यवस्थापन मास्टर प्लॅन तयार केला जात आहे. ऑगस्ट २०२७ पर्यंतचा ग्रामीण व शहरी कृती आराखडा, ग्रामपंचायत स्तरावर दुष्काळ निवारण समित्या, गावनिहाय संवेदनशीलता नकाशा (Vulnerability Mapping), प्रत्येक तालुक्यात नियंत्रण कक्ष, तसेच जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांच्या नियमित गावस्तरीय बैठका हे या नियोजनाचे प्रमुख घटक आहेत.*अनधिकृत उपशावर संयुक्त पथकांची नजर*अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी महसूल, जलसंपदा, पोलीस, महावितरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची संयुक्त पथके नेमण्यात आली आहेत. टंचाई ही आपत्ती नसून नियोजनाची कसोटी आहे, हेच प्रशासनाच्या या सज्जतेतून अधोरेखित होत असल्याचे चित्र आहे.

महिला व ज्येष्ठ नागरिकांना एनसीएमसी कार्डसाठी नवीन वर्षापर्यंत मुदतवाढ

मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत शासनाच्या निर्देशानुसार समाजातील विविध घटकांना सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. या सवलतींचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि प्रभावीपणे मिळावा, यासाठी महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी एनसीएमसी (NCMC) स्मार्ट कार्ड देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र, ग्रामीण भागातील अनेक महिला लाभार्थ्यांची कार्ड नोंदणी अद्याप अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच विविध सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे नेते आणि मंत्री महोदयांकडून करण्यात आलेल्या विनंत्या व सूचनांचा सकारात्मक विचार करून एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला १ जानेवारी २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना एसटीच्या प्रवासात मिळणाऱ्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी १ ऑक्टोबर २०२६ पासून एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले होते. आतापर्यंत सुमारे १ कोटी १० लाख कार्डांची नोंदणी व वितरण करण्यात आले आहे. मात्र, ग्रामीण भागातील अनेक महिला लाभार्थ्यांपर्यंत या योजनेची माहिती पोहोचली नसल्याने त्या अद्याप स्मार्ट कार्डपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब लक्षात घेऊन एसटी महामंडळाने आता ग्रामपंचायत स्तरावर विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रवासी संघटना आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून ही शिबिरे राबविण्यात येणार आहेत. या विशेष मोहिमेद्वारे ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत सर्व पात्र लाभार्थ्यांची १०० टक्के एनसीएमसी कार्ड नोंदणी व वितरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महामंडळाने निश्चित केले आहेमहिला व ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा; कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला मुदतवाढमहिला लाभार्थ्यांची मोठी संख्या आणि ग्रामीण भागात कार्ड नोंदणी करताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन तसेच विविध सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे नेते आणि मंत्री महोदयांकडून करण्यात आलेल्या विनंत्यांचा सकारात्मक विचार करून एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला १ जानेवारी २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना एनसीएमसी स्मार्ट कार्ड नसतानाही उद्या, दि. ७ नोव्हेंबर २०२६ पासून ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत एसटीच्या प्रवास सवलतींचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे कार्ड नोंदणी अद्याप पूर्ण न झालेल्या महिला व ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.या मुदतवाढीच्या कालावधीत सर्व पात्र महिला आणि ज्येष्ठ नागरिक लाभार्थ्यांनी आपले एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी करून घ्यावे, असे आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना प्रवास सवलतींच्या लाभापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी एसटी महामंडळ कटिबद्ध आहे. विशेष नोंदणी मोहिमेच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत एनसीएमसी स्मार्ट कार्ड पोहोचविण्याचा महामंडळाचा प्रयत्न आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी नागरिक, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि संबंधित यंत्रणांनी सहकार्य करावे, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ नोव्हेंबर २०२६

एक पणती लावून आलो

आज दिवाळीला
शेतशिवारी झाडाखाली
ऊन वाऱ्यात तेवणारी
काळोखाशी भिडणारी
एक पणती लावून आलो.

माझ्या कैक पिढ्यांना
भाकर देणाऱ्या मायमातीचा
टिळा मस्तकी लावताना
शिवार गाऱ्हाणं ऐकून आलो.

आता पावसाअभावी मातीची
ओल आटली म्हणतंय शिवार
माणूसकीचा दुष्काळ पडलेल्या देशात.

मग कसं बहरणार कोवळ पीक
या अवकाळी ऋतूत हिरवंगार?

आता...
आटलेल्या नद्या
कोरडीठाक धरणं
उघडी माळरानं पाहून
शिवार युती करायला सांगतंय माणसाला
जल जंगल अन् जमिनीशी
हिरव्या हंगामाच्या स्वप्नंपूर्तीसाठी..



ज्ञानेश्वर गायके,
कन्नड

तेजोमय दिवाळी

आली आली दिवाळी, सोनेरी पहाट,
दिव्यांच्या प्रकाशाने सजली ही वाट.
उत्साह नवा अन आनंदाची ही लाट,
आनंदाने सजला घराचा थाट.
उटण्याचा सुगंध अन अभ्यंगस्नान,
अंगणातली रांगोळी वाढवते मान.
दारोदारी पणत्यांचा लखलखाट,
सगळीकडे पसरला प्रकाशाचा साज.

आकाशात शोभे रंगीबेरंगी कंदील,
मनातील अंधार दूर होईल.
सोन्यासारख्या क्षणांची उधळण करूया,
प्रकाशाने प्रत्येकाचे आयुष्य उजळूया

लाडू, करंजी अन चकली चा चविष्ट फराळ,
नात्यांमध्ये वाढेल प्रेमाचा लळा.
हसऱ्या चेहऱ्यांनी उजळली घरे,
सगळीकडे पसरला आनंदाचा मेळा.

लक्ष्मीपूजन आणि गोड भाऊबीज,
समाधानाचे वाहो अंगणात बिज.
सदा राहो घरात समृद्धीची सावली,
तुम्हा सर्वांना जावो, आनंदाची दिवाळी!



प्रशांत काप्रतवार
छत्रपती संभाजीनगर

राज्यस्तरीय पहिले परिवर्तनवादी साहित्य संमेलनाची भूमिका : प्रा. शिवाजी वाठोरे

शक्यमुनी शील - प्रज्ञा - करुणेचा सागर महाकारुणिक तथागत भ. बुद्ध, समतेचे पांथस्थ चार्वाक, बहुजन प्रतिपालक कुळवाडी भूषण छ. शिवराय, आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज, महाराष्ट्रातील अत्यंत श्रीमंत उद्योगपती म. जोतिराव फुले, सावित्रीमाई, शेख फातिमा, माता भीमाई, माता रमाई, बोधिसत्व प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गाडगेबाबा यांसह सर्व महापुरुष आणि महामातांना प्रथमतः वंदन करतो. विचारमंचावर उपस्थित पहिल्या राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष गुरुवर्य डॉ. श्रीपाल सबनीस, उद्घाटक राज्याचे सामाजिक न्यायमंत्री मा. संजय शिरसाठ, स्वागताध्यक्ष ॲड. रामेश्वरजी तायडे, मुख्य संयोजक आमचे मित्र रतनकुमारजी साळवे, बालाजी सोनटक्के, चेतनजी राऊत, राजधरजी दांडगे, डॉ. धनराजजी गोंडाने, सभागृहात समोर बसलेले महनीय काही नावांचा उल्लेख केला पाहिजे असे गुरुवर्य डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर, प्रा. सुधीर अनावले, डॉ. वासुदेव मुलाटे, के. ई. हरिदास, डी. बी. जगत्पुरिया, धोंडोपंत मानवतकर, सुरेश साबळे, नारायण फाळके, भीमराव सरवदे, प्रा. भारत शिरसाठ, यशवंत खडसे, भाऊ पठाडे, विविध चॅनल आणि वृत्तपत्राचे सन्माननीय प्रतिनिधी, समविचारी मित्र, बंधू आणि भगिनींनो, या साहित्य संमेलनाचा आयुष्याच्या शेवटपर्यंत ध्यास घेणारे, दवाखान्यात शेवटच्या घटका मोजत असतानाही नाकाला लावलेल्या ऑक्सिजनच्या नळीसह व्हिडिओ करून संमेलनास उपस्थित राहण्याचे आवाहन ज्यांनी केले ते स्मृतिशेष अशोक जोहरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून मी येथे भूमिका मांडण्याचा प्रयत्न करतो. आपणा सर्वांना संमेलनाध्यक्ष गुरुवर्य डॉ. श्रीपाल सबनीस यांचे विचार ऐकायचे आहेत. त्या मुळे सुजान श्रोते आणि अध्यक्ष यांच्यामध्ये फार वेळ थांबून मी आपला जास्त वेळ घेणार नाही. केवळ या संमेलनाच्या आयोजनामागील भूमिका थोडक्यात विशद करण्याकरिता काही मिनिटांसाठी मी आपणासमोर उभा आहे. प्रथमतः अध्यक्षांनी आपल्या कार्यबाहुल्यातून वेळ काढून या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदासाठी होकार देऊन प्रत्यक्ष उपस्थिती दर्शविली, त्या बद्दल मन:पूर्वक धन्यवाद देतो. अध्यक्षांची तारीख मिळविण्यासाठी आम्ही मुख्य संयोजन समितीचे सदस्य या नात्याने प्रा. डॉ. सबनीस यांना भेटलो, तेव्हा परिवर्तनवादी साहित्य संमेलन हे नाव ऐकूनच त्यांनी समाधान व्यक्त केले. पिंपरी चिंचवड येथे भरलेल्या ८९ व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनास उमेदवार म्हणून निवडणुकीच्या मैदानात होते, तेव्हापासून माझा त्यांचा परिचय होता. त्यांनी कसलेही आढेवेढे न घेता संमेलनास येण्याचे मान्य केले. तसा एक व्हिडिओ तयार करून आमच्या स्वाधीन केला. पुणे येथील पेशवा आर्केड येथे भेट दिल्याचे समाधान मिळाले. बाजूलाच असलेला भिडेवाडा पाहून डोळ्याचे आणि मनाचे पारणे फिटले. साथींनो, ज्या छ. संभाजीनगर शहरातील म. जोतिराव फुले साहित्य नगरीत (तापडिया नाट्य मंदिर) हे साहित्य संमेलन भरविले जात आहे, या नगरीची महती काय वर्णावी? या शहराचे ऐतिहासिक - सांस्कृतिक महत्त्व आहेच. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पवन पदस्पर्शाने पुनित झालेली ही भूमी. नागसेनवन परिसरात मिलिंद महाविद्यालयाच्या रूपाने बाबासाहेबांनी शिक्षण उजेड तुमच्या आमच्या आयुष्यात आणला. अशा ऐतिहासिक - सांस्कृतिक ऊर्जस्वल असणाऱ्या शहरात ऐतिहासिक क्षणांचा साक्षीदार होण्याची संधी माझ्यासारख्या सामान्य साहित्यिक, कार्यकर्त्यास मिळते आहे, या बद्दल संमेलनाचे मुख्य संयोजक रतनकुमारजी साळवे यांना मनस्वी धन्यवाद देतो. छ. संभाजीनगर येथील जगप्रसिद्ध बौद्धलेण्या (पुष्पगुंफा), विबिका मकबरा, पाणचक्की हे सांस्कृतिक संचित. ५२ दरवाज्याचे शहर म्हणून हे शहर प्रसिद्ध आहे. या शहराने शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर, मास मुव्हमेंट, आर. पी. आय., सम्यक विद्यार्थी आंदोलन, भारतीय विद्यार्थी संसद, युवक क्रांती दल, माकप, भाकप आदी परिवर्तनवादी राजकीय, सामाजिक संघटनांनी सामान्य जणांसाठी उभारलेले लढे अनुभवले. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, मराठवाडा मुक्तिसंग्राम, लाँग मार्च, नामांतर लढा, मंडल आयोग समर्थन आदी लढ्यांची ही ऊर्जाभूमी. वंचित, दुर्बलांच्या चळवळीचा केंद्रबिंदू असे या शहराचे महात्म्य. इथे अनेक सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक चळवळी रुजल्या. फोफावल्या. तत्कालीन मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्रात अग्रलेख आणि वैचारिक लेखन करणारे डॉ. शंकरराव खरात, प्राचार्य म. भि. चिटणीस, डॉ. रफिक झकेरिया, डॉ. गंगाधर पानतावणे, कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. प्रभाकर मांडे, प्रा. बा. ह. कल्याणकर, प्रा. अविनाश डोळस, प्रा. बापुराव जगताप, प्राचार्य प्र. ई. सोनकांबळे, प्रा. सुखराम हिवराळे, डॉ. रुस्तुम अचलखांब, बशर नवाज, प्राचार्य राजाराम राठोड, जवाहर राठोड, के. ओ. गिऱ्हे, डॉ. अशोक गायकवाड, आर. के. त्रिभुवन, मोईन शाकीर अशा अनेक साहित्यिक, विचारवंत आणि संशोधक वृत्तीच्या माणसांची ही कर्मभूमी. शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात कार्यरत गंगाधर गाडे, ॲड. प्रीतमकुमार शेगावकर, कॉ. मनोहर टाकसाळ, माधवराव बोर्डे, डी.एल. हिवराळे, अजमलखान, एन. डी. पगारे, भाऊसाहेब मोरे, जे. डी. मोरे, ॲड. अकबर पटेल, गंगाधर तुपे, बी. टी. बहिरव, आसाराम जाधव गुरुजी, अमिनभाई जामगावकर, अशा कार्यकर्त्यांची यादी वाढतंच जाईल, ज्यांनी तहहयात सामाजिक क्षेत्रात कार्य केले. वृत्तपत्राच्या क्षेत्रात एक नोंद घेण्यासारखे नाव म्हणजे बाबा दळवी त्यांचीही ही कर्मभूमी. ही सगळी माणसं बाबासाहेबांच्या विचारांची मांडणी करणारी. दलित थिएटरच्या रूपाने मध्यंतरी कलेच्या क्षेत्रात परिवर्तनाचा विचार रुजत चालला होता. मित्रहो, भारतीय पटलावर प्राय: पुरोगामी राज्य म्हणून आपल्या राज्याची ओळख आहे.(आता ओळख होती असे म्हणावे लागेल.) स्वातंत्र्यपूर्व काळातही महाराष्ट्रात राजकीय - सामाजिक चळवळी रुजल्या. म. जोतिराव फुले, आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी समाजधुरिनांनी समतेचा विचार जोरकसपणे मांडला.श्री चक्रधर स्वामींनी सबंध राज्यभर आणि बृहन्महाराष्ट्रातही पायपीट केली.

(क्रमशः)



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ नोव्हेंबर २०२६

कवी नागेश बोंतेवाड यांची- 'पावसाने हजेरी लावावे!' जगाच्या पोशिंद्याची प्रार्थनापर कविता - प्राचार्य, डॉ. वसंत बिरादार

शीर्षकाची आर्तता आणि हजेरीचा अर्थ या कवितेचे शीर्षक 'पावसाने हजेरी लावावे!' हेच मुळात एक भजन आहे. शाळेत मास्तर हजेरी घेतात, जो गैरहजर आहे त्याला अनुपस्थित म्हणतात. इथे पाऊसच गैरहजर आहे. 'हजेरी लावावे' हा शब्द सरकारी नाही, तो शेतकऱ्याच्या भाषेतला हक्क आहे. पाऊस हा काही पाहुणा नाही की त्याला आमंत्रण द्यावे, तो तर या काळ्या माईच्या शाळेतला विद्यार्थीच आहे, त्याने आलंच पाहिजे. शीर्षकातली ही उद्गारवाचक खूण (!) ही मागणी नाही, ती हुकूम आहे, पण लेकाने आईसाठी केलेला हुकूम.२) काळ आणि हंगामाचे भान: रब्बीची गोष्ट कवी नागेश बोंतेवाड उगाच पावसाची गोष्ट करत नाही, तो'रब्बी पेरणीच्या हंगामात' असे स्पष्ट म्हणतो. रब्बी म्हणजे जिराईत आणि बागायतीच्या मधला नाजूक हंगाम. खरीप गेला की सगळं रब्बीवर अवलंबून. या एका शब्दात कवीचं शेतीविषयक ज्ञान आणि जाण दोन्ही दिसतं.'भेगाळलेल्या जमिनीस,पाहून का वरून हसला' ही ओळ रब्बीच्या तोंडावरचे वास्तव आहे. पावसाळा संपला, जमीन भेगाळली, आणि वरून ढग नुसता बघतोय. इथे 'हसला' हा शब्द फार बोचरा आहे. निसर्गाची ही क्रूर चेष्टा शेतकऱ्याला जास्त दुखवते.३) बाप या शब्दाचे रूपांतर व्यक्तीपासून समष्टीकडे नागेश बोंतेवाड यांच्या कवितेत 'बाप' हा शब्द तीन वेळा येतो आणि प्रत्येक वेळी त्याचा अर्थ विस्तारत जातो.पहिल्यांदा - 'पाण्या पावसाविना बाप, शेतात पीक कसे पिकवेल' इथे 'बाप' म्हणजे एकटा शेतकरी. हतबल, असहाय.दुसऱ्यांदा - 'आता वाटते बळीराजाला, पावसाने करू नये मजबूर' इथे 'बापा'चा बळीराजा होतो. तो एकटा नाही, तो एक जमात आहे, एक संस्कृती आहे. तिसऱ्यांदा - 'मेटाकुटीस आलेल्या बापाला, जोरदार पाऊस पाडून पाव' इथे 'बाप' हा अख्खा महाराष्ट्र होतो. मेटाकुटीस आलेला. हा शब्दाचा प्रवास व्यक्तीपासून समष्टीकडे जाणारा आहे आणि हेच या छोट्या कवितेचं मोठं यश आहे.४) अनुपस्थितीतून गडद दुष्काळ या कवितेत जे आहे त्यापेक्षा जे नाही त्याचे सौंदर्य जास्त आहे. पाखरं नाहीत, पीक नाही, पाणी नाही. 'शेत-शिवारात पाखरांचे, थवे दिसत नाही दूरदूर' ही कवितेतली सर्वात सुंदर ओळ आहे. कवीने दुष्काळाचे वर्णन केले नाही, त्याने फक्त पाखरं नाहीत असे सांगितले. जिथे दाणा नाही तिथे पाखरू कसे येणार? या अनुपस्थितीतूनच उपस्थित दुष्काळ अधिक गडद होतो. हे नसण्यातून असणं दाखवणं, हे उत्तम कवितेचं लक्षण आहे.५) संवादाची शैली भांडण, विनवणी आणि प्रेम ही कविता एका सुरात नाही. तिच्यात तीन आवाज आहेत. पहिला आवाज जाब विचारणारा - पाहून का वरून हसला'_ दुसरा आवाज हात जोडणारा - 'हात जोडूनी करतो विनंती' तिसरा आवाज हक्क सांगणारा - 'काळ्या माईच्या प्रेमापोटी' एकाच कवितेत शेतकरी मेघराजाशी भांडतोही, त्याला विनवणीही करतो आणि त्याला प्रेमाची आठवणही करून देतो. जसं एखाद्या जवळच्या माणसाशी आपण वागतो. पाऊस हा त्याचा शत्रू नाही, तो त्याचा रुसलेला सखाच आहे.६) जगाचे हाल होऊ नये म्हणून... बऱ्याच शेतकरी कविता स्वतःच्या दुःखात संपतात, पण ही कविता स्वतःच्या शेताच्या बांधाबाहेर जाते. 'जगाचे पोट भरण्यासाठी, आता लगबगीने तू धावावे' आणि- 'करू नको जगाचे हाल, बळीराजाच्या शेतामध्ये, पिकू दे खंडी खंडी माल' इथे शेतकरी स्वतःसाठी पीक मागत नाही. तो म्हणतो जगाचे हाल होऊ नयेत. खंडी खंडी माल हा त्याच्या घरासाठी नाही, तो जगासाठी आहे. या दोन ओळींमुळे ही कविता केवळ मागणीची कविता न राहता, ती जगाच्या पोशिंद्याची प्रार्थना बनते. आणि म्हणूनच तिच्या शेवटी दया येते, कीव येत नाही, तर आदर वाटतो. एकुणच कविता छानंय.

नागेश बोंतेवाड, छत्रपती संभाजीनगर

आश्रम शाळांना अनुदान द्या: संस्थाचालकांची मागणी



कर्मचारी संघटनेने बोलवलेल्या बैठकीत सर्व संस्थांचालकचा वेतनश्रेणीसाठी एक मत होवुन शासनाने तात्काळ 100% अनुदान द्यावे...आज दिनांक 3/11/2026 रोजी शाहू फुले आंबेडकर 165 आश्रम शाळेतील सर्व संस्था चालक यांची आज कर्मचारी संघटनेच्या वतीने विचार विनिमय संवाद बैठक गोदावरी पब्लिक स्कूल छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आली आणि या बैठकीत संस्थाचालक संघटनेचे अध्यक्ष संस्थाचालकांच्या वतीने ॲड ब्रह्मानंद चव्हाण अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. तसेच उपस्थित प्रमुख पाहुणे सन्माननीय जगदिश घाटे , दिलीप होनराव , गोविंद वनवे , भास्कर वाकोडे , श्रीकांत मोरे , पोपट खामकर आणि इतर सर्व संस्थांचालक यांनी एकमत दाखवत वेतनश्रेणीसाठी हा लढा लवकरात लवकर यशस्वी ठरला पाहिजे. तसेच मागील महिन्यात मंत्री महोदय यांच्या बद्दल एका संस्थाचालकाने जो व्हिडिओ तयार करून टाकलेला होता त्या संस्थाचालकचा निषेध या बैठकीत करण्यात आला.आणि सन्माननीय मंत्री महोदयाची भेट घेऊन कर्मचारी संघटनेच्या वतीने आपल्याला न्याय मिळाला पाहिजे. या भूमिकेतून ही बैठक आज पार पाडण्यात आली. तसेच कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अविनाश काळे सर यांच्या नेतृत्वात आयोजित बैठकीत वेतनश्रेणीसाठी हा विषय लवकर निकाली काढावा. आणि महाराष्ट्रातील तमाम सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची जी निराशा झाली. ती दूर करावी लवकरात लवकर वेतनश्रेणी न्याय मिळावा.या करिता ही बैठक ठेवण्यात या बैठकीला संघटनेचे सर्व प्रतिनिधी यांच्या उपस्थित व सर्व संस्था चालक यांच्या भूमिकेतून एकच ठराव घेण्यात आला तो म्हणजे वेतनश्रेणींना हा निर्णय लवकरात लवकर मार्गी लावावा... या बैठकीचे अध्यक्ष ऍड. ब्रह्मानंद चव्हाण साहेब चांगल्या पद्धतीने मार्गदर्शन करून संस्था चालकांच्या वतीने कर्मचारी संघटनेला पाठिंबा दर्शवला आहे... या बैठकीत महाराष्ट्रातून अनेक संस्थाचालक संचालक यांची प्रामुख्याने उपस्थिती होती व विशेष अतिथी म्हणून श्री ऍड सिद्धार्थ चव्हाण हे होते.

कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय १ जानेवारी २०२७ पर्यंत पुढे ढकलला

मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) : महिलांना एसटी प्रवासात मिळणाऱ्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला १ जानेवारी २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे ७ नोव्हेंबरपासून ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत स्मार्ट कार्ड नसतानाही महिला लाभार्थ्यांना प्रवास सवलतींचा लाभ घेता येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. शासनाच्या निर्देशानुसार प्रवास सवलतींचा लाभ अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी एसटी महामंडळाने एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरणाची प्रक्रिया सुरू केली आहे. १ ऑक्टोबर २०२६ पासून हे कार्ड महिला व ज्येष्ठ नागरिकांना अनिवार्य करण्यात आले होते. आतापर्यंत सुमारे १ कोटी १० लाख कार्डांची नोंदणी व वितरण झाले आहे. मात्र, ग्रामीण भागातील अनेक महिलांची नोंदणी अद्याप अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब लक्षात घेऊन तसेच विविध सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे नेते आणि मंत्री महोदयांकडून करण्यात आलेल्या विनंती व सुचनांचा सकारात्मक विचार करून महामंडळाने हा निर्णय घेतला आहे. ग्रामपंचायत स्तरावर विशेष नोंदणी शिबिरेराज्यातील सर्व पात्र लाभार्थ्यांपर्यंत स्मार्ट कार्ड पोहोचविण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रवासी संघटना आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येईल. ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत सर्व महिला लाभार्थ्यांची १०० टक्के नोंदणी व कार्ड वितरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महामंडळाने निश्चित केले आहे. या मुदतवाढीच्या कालावधीत सर्व महिलांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डची नोंदणी पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे

'एक दिवा कवितेचा' (वर्ष दुसरे)

छत्रपती संभाजीनारग : ध्यास गझल साहित्य समूह, टेरेसवरील कविता परिवार आणि ट्रान्स डेल्टा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी पाडवा निमित्त १० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ६:०० वाजता,सिडको येथील मृद्गंध कला दालन ,वैजनाथ हॉस्पिटल जवळ,' एक दिवा कवितेचा ' या बहारदार काव्य मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे.या मैफलीचे हे दुसरे वर्ष आहे.शब्दांच्या या उत्सवात यावर्षी दर्जेदार लेखन करणारे नामांकित कवी आपले काव्य सादरीकरण करणार आहेत .यात कवी प्रा.डॉ ललित अधाने ,प्रिया धारूरकर,रूपाली पाटील,शमा बरडे,अजय त्रिभुवन,प्रगती साहुजी,विजय पांचाळ यांचा समावेश आहे.कवी संमेलनाचे सूत्रसंचालन श्री.द्वारकानाथ जोशी करतील. स्वागत समारंभाचे सूत्रसंचालन कवयित्री मृणाल देशपांडे करतील.या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून सन्माननीय श्री सागर देशमुख (सहाय्यक पोलिस आयुक्त छ.संभाजीनगर) तर प्रमुख पाहुणे म्हणून सन्माननीय श्री निलेश राऊत (सचिव,यशवंतराव चव्हाण सेंटर,मुंबई - छत्रपती संभाजीनगर) हे उपस्थित असतील.काव्य मैफली नंतर शहरातील कवींचे स्नेहमिलनदेखील संपन्न होईल.या मैफलीसाठी प्रवेश विनामूल्य असेल.दिव्यांच्या झगमगाटात, पहाटेच्या रम्य वातावरणात शब्दांचा प्रकाश आणि भाव-भावनांचा गंध अनुभवण्यासाठी काव्य रसिकांनी, शहरातील कवींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक कवी,गझलकार श्री. गिरीश जोशी आणि कवी श्री प्रशांत नानकर यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी ९२२६७५०६२१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ नोव्हेंबर २०२६

विभागनिहाय आणि जिल्हानिहाय मदतीचे वितरण; तांत्रिक अडचणी दूर करून उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही मदत

मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) : राज्यातील ३०४ दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी आर्थिक दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येकी पाच हजार रुपये दिवाळी अग्रीम देण्याची ग्वाही दिली होती. यानुसार ५ नोव्हेंबर २०२६ अखेर राज्यातील ८७ लाख ४५ हजार ६६९ शेतकऱ्यांच्या खात्यात ४ हजार ३७२ कोटी ८३ लाख रुपयांची दिवाळी अग्रीम मदत वितरित झाली आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही मदत देण्याची प्रक्रिया सुरू असून, तांत्रिक अडचणींमुळे काही शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली नसल्यास त्या अडचणी दूर करून त्यांनाही अग्रीम मदत देण्यात येणार असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सणासुदीच्या काळात आर्थिक आधार मिळावा, यासाठी शासनाने दिवाळी अग्रीम मदतीचा निर्णय घेतला. महसूल, मदत व पुनर्वसन आणि कृषी विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मदत वितरणाची प्रक्रिया युद्धपातळीवर राबववून थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदतीची रक्कम जमा करण्यावर भर देण्यात आला. या मदतीमुळे लाखो शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला आहे, असेही मंत्री जाधव पाटील यांनी सांगितले.विभागनिहाय आणि जिल्हानिहाय मदत वितरणअमरावती विभागातील १२ लाख ८२ हजार २०३ शेतकऱ्यांच्या खात्यात ६४१ कोटी १० लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये अकोला जिल्ह्यातील १ लाख ६२ हजार १५२ शेतकऱ्यांना ८१ कोटी ८ लाख रुपये, अमरावती जिल्ह्यातील ३ लाख ६ हजार ७०९ शेतकऱ्यांना १५३ कोटी ३५ लाख रुपये, बुलढाणा जिल्ह्यातील ४ लाख २५ हजार ८३३ शेतकऱ्यांना २१२ कोटी ९२ लाख रुपये, वाशिम जिल्ह्यातील १ लाख ५९ हजार ५०८ शेतकऱ्यांना ७९ कोटी ७५ लाख रुपये आणि यवतमाळ जिल्ह्यातील २ लाख २८ हजार १ शेतकऱ्यांना ११४ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.छत्रपती संभाजीनगर विभागातील ३३ लाख ३६ हजार ३६० शेतकऱ्यांच्या खात्यात १६६८ कोटी १८ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये बीड जिल्ह्यातील ६ लाख १२ हजार ९३ शेतकऱ्यांना ३०६ कोटी ५ लाख रुपये, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ४ लाख ४४ हजार ३८२ शेतकऱ्यांना २२२ कोटी १९ लाख रुपये, धाराशिव जिल्ह्यातील ३ लाख ४७ हजार ७२ शेतकऱ्यांना १७३ कोटी ५४ लाख रुपये, हिंगोली जिल्ह्यातील २ लाख १२ हजार ७६० शेतकऱ्यांना १०६ कोटी ३८ लाख रुपये, जालना जिल्ह्यातील ४ लाख ३८ हजार ८४४ शेतकऱ्यांना २१९ कोटी ४२ लाख रुपये, लातूर जिल्ह्यातील ३ लाख ८१ हजार ९६१ शेतकऱ्यांना १९० कोटी ९८ लाख रुपये, नांदेड जिल्ह्यातील ५ लाख ६२ हजार ८६८ शेतकऱ्यांना २८१ कोटी ४३ लाख रुपये आणि परभणी जिल्ह्यातील ३ लाख ३६ हजार ३८० शेतकऱ्यांना १६८ कोटी १९ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.कोकण विभागातील ६३ हजार ६४७ शेतकऱ्यांच्या खात्यात ३१ कोटी ८२ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये पालघर जिल्ह्यातील ८ हजार २१३ शेतकऱ्यांना ४ कोटी ११ लाख रुपये, रायगड जिल्ह्यातील २ हजार २१८ शेतकऱ्यांना १ कोटी ११ लाख रुपये, रत्नागिरी जिल्ह्यातील २२ हजार ४९४ शेतकऱ्यांना ११ कोटी २५ लाख रुपये आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ३० हजार ७२२ शेतकऱ्यांना १५ कोटी ३६ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.नागपूर विभागातील ७ लाख ५० हजार ४१ शेतकऱ्यांच्या खात्यात ३७५ कोटी २ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये भंडारा जिल्ह्यातील १ लाख १५८ शेतकऱ्यांना ५० कोटी ८ लाख रुपये, चंद्रपूर जिल्ह्यातील २ लाख ६२९ शेतकऱ्यांना १०० कोटी ३१ लाख रुपये, गडचिरोली जिल्ह्यातील ३० हजार ७८८ शेतकऱ्यांना १५ कोटी ३९ लाख रुपये, गोंदिया जिल्ह्यातील ७४ हजार ९१० शेतकऱ्यांना ३७ कोटी ४६ लाख रुपये, नागपूर जिल्ह्यातील १ लाख ९२ हजार ७६६ शेतकऱ्यांना ९६ कोटी ३८ लाख रुपये आणि वर्धा जिल्ह्यातील १ लाख ५० हजार ७९० शेतकऱ्यांना ७५ कोटी ४० लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.नाशिक विभागातील १८ लाख ७ हजार ३२ शेतकऱ्यांच्या खात्यात ९०३ कोटी ५२ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील ८ लाख ७ हजार २८४ शेतकऱ्यांना ४०३ कोटी ६४ लाख रुपये, धुळे जिल्ह्यातील ६५ हजार ९३० शेतकऱ्यांना ३२ कोटी ९७ लाख रुपये, जळगाव जिल्ह्यातील ४ लाख ८ हजार ६३५ शेतकऱ्यांना २०४ कोटी ३२ लाख रुपये, नंदुरबार जिल्ह्यातील १ लाख ७ हजार ५३४ शेतकऱ्यांना ५३ कोटी ७७ लाख रुपये आणि नाशिक जिल्ह्यातील ४ लाख १७ हजार ६४९ शेतकऱ्यांना २०८ कोटी ८२ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.पुणे विभागातील १५ लाख ६ हजार ३८६ शेतकऱ्यांच्या खात्यात ७५३ कोटी १९ लाख रुपये जमा झाले आहेत. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ७४ हजार ८९३ शेतकऱ्यांना ३७ कोटी ४५ लाख रुपये, पुणे जिल्ह्यातील ३ लाख २८ हजार ५४२ शेतकऱ्यांना १६४ कोटी २७ लाख रुपये, सांगली जिल्ह्यातील २ लाख ६ हजार ६०० शेतकऱ्यांना १०३ कोटी ३० लाख रुपये, सातारा जिल्ह्यातील ३ लाख १ हजार ४६७ शेतकऱ्यांना १५० कोटी ७३ लाख रुपये आणि सोलापूर जिल्ह्यातील ५ लाख ९४ हजार ८८४ शेतकऱ्यांना २९७ कोटी ४४ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.तांत्रिक अडचणी दूर करून उर्वरित शेतकऱ्यांनाही मदतकाही शेतकऱ्यांच्या बँक खात्यांशी संबंधित तांत्रिक अडचणी, खाते तपशीलातील त्रुटी किंवा अन्य कारणांमुळे मदतीची रक्कम जमा होण्यास विलंब झाला आहे. अशा शेतकऱ्यांच्या अडचणींचे निराकरण करून त्यांना अग्रीम मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त एकही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासन कटिबद्ध असून, दिवाळी अग्रीम मदतीच्या वितरणावर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतर उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही मदत मिळणार असल्याचे मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी स्पष्ट केले.

टँकर, नियंत्रण कक्ष आणि गावोगावी नियोजन: टंचाईविरुद्ध जिल्हा प्रशासनाची सज्जता

यंदा एल-निनोच्या प्रभावामुळे बीड जिल्ह्यात पावसाने सरासरीपेक्षा कमी हजेरी लावली. जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ५६६.१ मिमी असताना ३० सप्टेंबर २०२६ अखेर प्रत्यक्षात ३५६.६ मिमी, म्हणजे सुमारे ६३ टक्के पाऊस झाला. ऑगस्टमध्ये केवळ १८.७ टक्के आणि सप्टेंबरमध्ये ४१.६ टक्के पाऊस पडल्याने पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने वेळीच पावले उचलली आहेत.धरणांतील पाणीसाठा केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा आदेश १२ जून २०२६ रोजीच काढण्यात आला. टँकर मंजुरीचे अधिकार १२ सप्टेंबर २०२६ च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले, त्यामुळे गावांच्या मागणीवर तातडीने निर्णय घेता येत आहे. २ नोव्हेंबर २०२६ रोजी १७२ गावे आणि १८३ वाड्यांतील ४,२९,८४२ लोकसंख्येला २९४ टँकर आणि ४५ विहीर/बोअर अधिग्रहणांद्वारे पिण्याचे पाणी पुरवले जात आहे. यापैकी २५७ टँकर ग्रामीण भागात, तर ३७ नागरी भागात कार्यरत आहेत. गेवराई (१२५) आणि आष्टी (७४) तालुक्यांत सर्वाधिक टँकर सुरू आहेत.टँकर भरण्यासाठी जिल्हा परिषदेने ८९ फिलिंग पॉइंट निश्चित केले असून तालुकानिहाय आश्वासित जलस्रोतांची यादी तयार आहे. सुरू असलेल्या सर्व टँकरची उपविभाग बदलून क्रॉस तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, जेणेकरून पुरवठा पारदर्शक आणि सुरळीत राहील. भूजलाचे संरक्षण करण्यासाठी २ नोव्हेंबर २०२६ च्या आदेशाने जिल्ह्यात नवीन बोअरवेल खोदकामावर निर्बंध घालण्यात आले असून यापुढे उपविभागीय अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी बंधनकारक आहे.जिल्हाधिकारी स्तरावर सविस्तर दुष्काळ व्यवस्थापन मास्टर प्लॅन तयार केला जात आहे. ऑगस्ट २०२७ पर्यंतचा ग्रामीण व शहरी कृती आराखडा, ग्रामपंचायत स्तरावर दुष्काळ निवारण समित्या, गावनिहाय संवेदनशीलता नकाशा (Vulnerability Mapping), प्रत्येक तालुक्यात नियंत्रण कक्ष आणि जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांच्या नियमित गावस्तरीय बैठका हे या नियोजनाचे मुख्य घटक आहेत. अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी महसूल, जलसंपदा, पोलीस, महावितरण व स्थानिक स्वराज्य संस्थांची संयुक्त पथके नेमण्यात आली आहेत. टंचाई ही आपत्ती नसून नियोजनाची कसोटी आहे, हेच प्रशासनाच्या या सज्जतेतून दिसून येते

भगवंत पाळवदे
बीड

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry , MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ नोव्हेंबर २०२६

बौद्ध धम्मातील 'दिपावली' (दीपदानोत्सव) चे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व

भारत हा विविध सांस्कृतिक प्रवाहांनी आणि संप्रदायांनी नटलेला देश आहे. येथील बहुतांश सण आणि उत्सव धार्मिक कथांच्या चौकटीत बांधले गेले आहेत, परंतु जेव्हा आपण भारतीय संस्कृतीच्या प्राचीन व मूळ स्रोतांचा सखोल शोध घेतो, तेव्हा अनेक सण हे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे श्रमण परंपरा, बौद्ध धम्म आणि प्राचीन भारतीय सम्राटांच्या इतिहासाशी जोडलेले आढळतात. यांपैकीच एक अत्यंत महत्त्वाचा आणि व्यापक स्वरूपाचा सण म्हणजे 'दिपावली' किंवा 'दीपदानोत्सव' होय.सर्वसामान्यपणे दिपावली हा सण पौराणिक कथांशी (जसे की प्रभू रामचंद्रांचे अयोध्या आगमन इत्या.) जोडून पाहिला जातो. परंतु, बौद्ध इतिहास, पाली वाङ्मय, सम्राट अशोककालीन संस्कृती आणि प्राच्यविद्या अभ्यासकांच्या मते, दिपावलीचे मूळ रूप आणि त्यामागील प्रकाशोत्सवाचा इतिहास हा तथागत गौतम बुद्ध आणि मौर्य कालीन चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या ऐतिहासिक घटनांशी अत्यंत सुसंवादी व मिळताजुळता आहे. बौद्ध धम्माच्या दृष्टिकोनातून दिपावलीचे महत्त्व, ऐतिहासिक संदर्भ, तात्विक भूमिका आणि त्याचे वर्तमानकालीन मुल्य समजून घेणे गरजेचे आहे.'अप्पो दीपो भवः' दिपावलीचा मूळ बौद्ध तात्विक पायाबौद्ध धम्मात बाह्य अंधकारावर मात करण्यासाठी भौतिक दिव्यांपेक्षा ज्ञानाचा प्रकाश (प्रज्ञा) अधिक महत्त्वाचा मानला गेला आहे. महापरिनिर्वाणापूर्वी तथागत गौतम बुद्धांनी आपल्या अंतिम उपदेशात भिक्खू संघाला आणि संपूर्ण मानवतेला जे अमूल्य वचन दिले, ते बौद्ध प्रकाशोत्सवाचा कणा आहे."अप्पो दीपो भवः" (अर्थात: स्वतःचा दीप स्वतःच व्हा, स्वतःच आपला प्रकाश व्हा.) बुद्धांच्या या तत्त्वज्ञानानुसार, मनुष्याच्या जीवनातील खरा अंधकार हा अज्ञान, तृष्णा, मोह आणि द्वेष यांचा आहे. या मानसिक अंधकाराला दूर करण्यासाठी प्रज्ञा, शील आणि समाधीरुपी दिव्याची आवश्यकता असते. बौद्ध धम्मात दीपावली किंवा दीपदान म्हणजे केवळ मातीचे दिवे लावून घरे उजळवणे नव्हे, तर आपल्या अंतःकरणातील अज्ञानाचा अंधार नष्ट करून करुणेचा व समतेचा प्रकाश पसरवणे होय. अज्ञानाच्या पडद्याला भेदून धम्माचे सत्य लोकांपर्यंत पोहोचवणे. शील पालनामुळे जीवनात निर्माण होणारे पावित्र्य म्हणजेच खरा प्रकाश होय.सम्राट अशोक आणि दीपदानोत्सवप्राचीन बौद्ध ग्रंथांचा (विशेषतः महावंश आणि अशोकवदान) अभ्यास केला असता असे स्पष्ट होते की, सम्राट अशोकांनी बौद्ध धम्माच्या प्रसारासाठी आणि लोककल्याणार्थ अनेक ऐतिहासिक कार्ये केली. कार्तिक अमावस्येच्या किंवा शरद ऋतूच्या या कालखंडात सम्राट अशोकांनी बौद्ध धम्माच्या प्रसाराची व लोककल्याणकारी कार्याची रुजूवात केली होती.८४,००० स्तूपांची प्रतिष्ठापना व रोषणाईऐतिहासिक प्रक्रियेनुसार, सम्राट अशोकांनी बुद्धांच्या पवित्र अस्थींचे वाटप करून संपूर्ण भारतभर व बौद्ध SPREAD झालेल्या प्रदेशांत ८४,००० स्तूपांची आणि विहारांची निर्मिती केली. या स्तूपांची निर्मिती पूर्ण झाल्यानंतर आणि त्यांच्या प्रतिष्ठापनेच्या प्रसंगी संपूर्ण राज्यात आनंदोउत्सव साजरा करण्यात आला. या ऐतिहासिक प्रसंगी राज्यातील प्रत्येक नागरिकाने आपापल्या घरासमोर, विहारांवर आणि स्तूपांवर दिवे लावून रोषणाई केली. हाच दिवस पुढे 'दीपदानोत्सव' म्हणून रूढ झाला, जो आजच्या दिपावलीचे मूळ ऐतिहासिक रूप मानला जातो.कपिलवस्तु येथे तथागत बुद्धांचे आगमनपाली साहित्यातील वर्णनानुसार, बुद्धत्व प्राप्त केल्यानंतर तथागत गौतम बुद्ध जेव्हा दीर्घकाळानंतर आपली जन्मभूमी कपिलवस्तू येथे परतले, तेव्हा त्यांचे स्वागत करण्यासाठी संपूर्ण नगर सजवण्यात आले होते. शाक्य वंशाच्या नागरिकांनी आणि भिक्षुसंघाने बुद्धांच्या स्वागतासाठी घरांसमोर दीप प्रज्वलित केले होते. तो दिवस जगभर आनंदाचा आणि ज्ञानाच्या आगमनाचा दिवस मानला गेला. हा ऐतिहासिक प्रसंग बौद्ध अनुयायांसाठी अत्यंत प्रेरणादायी मानला जातो.बौद्ध संस्कृतीनुसार दिपावलीचे विविध पैलू (सप्तरंगी उत्सव)बौद्ध विचारसरणीनुसार दिपावली हा केवळ एका दिवसाचा सण नसून तो मानवी मूल्ये, निसर्गपूजा आणि धम्मचरिते यांच्याशी जोडलेला एक सात्विक प्रकाशोत्सव आहे.दिपावलीचे पाच दिवस आणि बौद्ध व ऐतिहासिक संदर्भवसुबारस (पहिला दिवस)या दिवशी बाल बुद्धांच्या बाल्यकाळाचे व त्यांच्या जीवनकार्याचे स्मरण केले जाते. बालपणापासूनच संस्कार, करुणा आणि अहिंसेचे बीज रोपणे हा यामागील उद्देश आहे.धनत्रयोदशी (धनतेरस) हा दिवस भिक्षुसंघ आणि धम्मदानाची परंपरा म्हणून पाहिला जातो. बौद्ध धम्मात ज्ञान आणि शील हेच माणसाचे खरे 'धन' मानले गेले आहे, ज्याचे दान करणे सर्वात मोठे धन मानले जाते.नरक चतुर्दशी / लक्ष्मी पूजन बौद्ध संस्कृतीत या दिवशी महामाता महामाया (तथागत बुद्धांच्या माता) यांचे स्मरण केले जाते व त्यांना आदरांजली वाहिली जाते. याद्वारे स्त्रीशक्तीचा सन्मान, मातांचा गौरव आणि समाजात समृद्धी व नैतिक संपत्तीची स्थापना करण्याचा संदेश दिला जातो.दिपावली / पाडवा हा सम्राट अशोक कालीन स्तूप रोषणाई आणि दीपदान उत्सवाचा मुख्य दिवस आहे. अज्ञानाचा अंधकार नष्ट करून प्रज्ञा आणि करुणेचा मार्ग स्वीकारण्याची ही वेळ असते.भाऊबीजया दिवशी भिक्षू महेंद्र आणि संघमित्रा या धम्मदूतांच्या ऐतिहासिक कार्याचे स्मरण केले जाते. भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्यासोबतच धम्माच्या प्रसारातील स्त्री-पुरुषांच्या समान सहभागाचा गौरव यामध्ये दिसून येतो.वर्तमानकालीन प्रासंगिकताआजच्या आधुनिक युगात, जेव्हा समाज स्पर्धा, नैराश्य आणि अज्ञानाच्या अंधकारात लोटला जात आहे, अशा वेळी बौद्ध धम्मातील दिपावलीचे विचार अधिक समर्पक ठरतात. फटाक्यांची आतिषबाजी करून प्रदूषण पसरवण्याऐवजी मातीचे दिवे लावून नैसर्गिक प्रकाश पसरवणे हा बौद्ध संस्कृतीचा मुख्य उद्देश आहे. दिपावलीच्या निमित्ताने केवळ घराची स्वच्छता न करता आपल्या मनाची स्वच्छता करणे आणि संविधानाने दिलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा प्रकाश आपल्या जीवनात रुजवणे म्हणजेच खरी बौद्ध दिपावली होय. हा उत्सव आपल्याला बाह्य प्रकाशासोबतच अंतर्यामी ज्ञानाचा दीप प्रज्वलित करण्याची प्रेरणा देतो.वैज्ञानिक, सामाजिक आणि समतावादी दृष्टीकोनबौद्ध धम्म हा तार्किक, वैज्ञानिक आणि निसर्गसुसंगत विचारांवर आधारित आहे. त्यामुळे बौद्ध धम्मात दीपोत्सव साजरा करताना कोणत्याही अंधश्रद्धा, हिंसक प्रथा किंवा प्राण्यांचे बलिदान यांना स्थान नाही.पर्यावरणपूरक उत्सवफटाक्यांची आतषबाजी करून प्रदूषण पसरवण्याऐवजी मातीचे दिवे लावून नैसर्गिक प्रकाश पसरवणे हा बौद्ध संस्कृतीचा मुख्य उद्देश आहे. मातीचे दिवे हे मातीशी जोडले असण्याचे आणि साधेपणाचे प्रतीक आहेत.समता आणि बंधुभावबौद्ध विचारसरणीतील दिपावली ही जात, पात, वर्ग किंवा लिंगभेद यांच्या पलीकडे जाऊन संपूर्ण मानवतेला एकत्र आणणारी आहे. सर्व धम्मप्रेमी एकत्र येऊन विहारांमध्ये बुद्धवंदना करतात आणि सामूहिक 'उपोसथ' (नैतिक नियम पाळणे व धम्म चर्चा करणे) आचरणात आणतात.अर्थव्यवस्था आणि श्रमप्रतिष्ठा धनत्रयोदशीच्या निमित्ताने समाजातील कारागीर (जसे की कुंभार, जे मातीचे दिवे बनवतात) यांच्या श्रमाचा सन्मान करणे आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा यामागचा सामाजिक उद्देश आहे. धनत्रयोदशीचा सण केवळ सोन्या-नाण्यांच्या खरेदीपुरता मर्यादित नसून, तो श्रमप्रतिष्ठेचा आणि समाजमनातील जिव्हाळ्याचा उत्सव आहे. मातीचे दिवे बनवणारे कुंभार किंवा इतर कारागीर हे आपल्या संस्कृतीचे खरे शिल्पकार आहेत. त्यांच्या कष्टाशिवाय सणांचा आनंद अपूर्ण आहे. त्यांच्या श्रमाचा सन्मान करणे म्हणजेच आपल्या संस्कृतीच्या पायाचा आदर करणे होय. सणासुदीच्या काळात अशा स्थानिक कारागिरांकडून (उदा. मातीचे दिवे, पणत्या, हस्तकला वस्तू) खरेदी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे त्यांच्या हाताला काम मिळते, सणाचा आनंद त्यांच्याही घरात पोहोचतो आणि स्थानिक अर्थव्यवस्था (Local Economy) बळकट होते."व्होकल फॉर लोकल" (Vocal for Local) या तत्त्वाचा अवलंब करून, या हातावर पोट असलेल्या कलाकारांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे.थोडक्यात सांगायचे तर, जेव्हा आपण यंत्रांऐवजी हाताच्या घामातून साकारलेल्या वस्तूंना प्राधान्य देतो, तेव्हाच खरी समृद्धी साजरी होते आणि अर्थव्यवस्थेला खरा मानवी चेहरा मिळतो.वर्तमानकालीन

प्रासंगिकताआजच्या आधुनिक युगात, देश, समाज स्पर्धा, नैराश्य, स्वार्थीपणा आणि अज्ञानाच्या अंधकारात लोटला जात आहे, अशा वेळी बौद्ध धम्मातील दिपावलीचे विचार अधिक समर्पक ठरतात. दिपावलीच्या निमित्ताने केवळ घराची स्वच्छता न करता आपल्या मनाची स्वच्छता करणे, वाईट प्रवृत्तींचा त्याग करणे आणि संविधानाने दिलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा प्रकाश आपल्या जीवनात रुजवणे म्हणजेच खरी बौद्ध दिपावली होय.शेवटी असे म्हणता येईल की, दिपावली हा सण केवळ एका विशिष्ट धार्मिक आख्यायिकेपुरता मर्यादित नसून तो प्राचीन भारतीय श्रमण संस्कृती, सम्राट अशोक यांचा दीपदान इतिहास आणि तथागत बुद्धांच्या "अप्पो दीपो भवः" या बुद्ध मुल्यांशी, मानवी संदेशाशी जोडलेला एक महान प्रकाशोत्सव आहे. हा उत्सव आपल्याला बाह्य प्रकाशासोबतच अंतर्यामी ज्ञानाचा दीप प्रज्वलित करण्याची प्रेरणा देतो.

प्रा. डॉ. सिध्दोधन,
मो. ९४२०६७१७५०
dr.siddhodhankamble85466@gmail.com


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ नोव्हेंबर २०२६

नात्यांच्या अनवट वाटांचा संवेदनशील शोध

'कुळवाडी दिवाळी अंक २०२६'



साहित्याची खरी ताकद माणसाला स्वतःच्या जगण्याकडे आणि सभोवतालच्या समाजाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहायला शिकवण्यात असते. साहित्य केवळ मनोरंजन करत नाही, तर ते विचार करायला प्रवृत्त करते, संवेदना जागृत करते आणि आपल्या जगण्याचा फेरविचार करण्यास भाग पाडते. याच दृष्टीने 'कुळवाडी दिवाळी अंक २०२६'चा 'नाती विशेषांक' हा मानवी संबंधांचे विविध पदर उलगडणारा आणि माणुसकीच्या व्यापक अर्थाचा शोध घेणारा महत्त्वपूर्ण साहित्यिक दस्तऐवज ठरतो. नाती हा प्रत्येकाच्या जीवनाशी जोडलेला विषय असला, तरी त्यांचे स्वरूप अत्यंत गुंतागुंतीचे आहे. आई-वडील, भावंडे, पती-पत्नी, मित्र, शिक्षक-विद्यार्थी अशा रक्ताच्या आणि सामाजिक नात्यांबरोबरच माणसाचे निसर्ग, माती, इतिहास, साहित्य आणि समाजाशीही नाते असते. या नात्यांमध्ये प्रेम, विश्वास, आपुलकी आणि सहकार्य असते; त्याचबरोबर अपेक्षा, संघर्ष, दुरावा आणि भावनिक गुंतागुंतही असते. या विशेषांकाचे वैशिष्ट्य म्हणजे नात्यांचा विचार केवळ भावनिक चौकटीत न करता व्यापक सामाजिक आणि वैचारिक संदर्भात करण्याचा प्रयत्न. आज संपर्काची साधने वाढली आहेत; मात्र संवाद कमी होत आहे. मोबाईलच्या पडद्यावर शेकडो माणसे जोडलेली असतात, पण मनातील भावना व्यक्त करण्यासाठी जवळचे माणूस शोधावे लागते. अशा काळात नात्यांचा अर्थ, त्यांची गरज आणि त्यातील परस्परांचा सन्मान यांचा विचार करणारा हा विशेषांक विशेष महत्त्वाचा ठरतो. या अंकातील **डॉ. आ. ह. साळुंखे यांची डॉ. माधव जाधव** यांनी घेतलेली मुलाखत विशेष उल्लेखनीय आहे. नात्यांची जपणूक करताना विवेक, समता आणि परस्परांचा सन्मान महत्त्वाचा असल्याचे विचार या मुलाखतीतून अधोरेखित होतात. नात्यांच्या नावाखाली व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच किंवा अन्याय स्वीकारणे योग्य नाही. प्रेम असावे, पण मालकीभाव नसावा; जबाबदारी असावी, पण व्यक्तिमत्त्वाची गळचेपी होऊ नये, ही भूमिका आजच्या बदलत्या समाजव्यवस्थेत महत्त्वाची आहे. **लेख विभागात** 'नात्यांच्या निर्मितीचा शोध', 'नात्यांचा पूल सांधूया', 'नातेसंबंध : प्रेम, संघर्ष आणि गुंतागुंत', 'ओझे नात्यांचे!', 'नातं शिवछत्रपतींशी!' आणि 'नाती माणुसकीची' अशा विविध विषयांचा समावेश आहे. यातून नात्यांचे कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक पैलू समोर येतात. विशेषतः रक्ताच्या नात्यांपलीकडे माणुसकीच्या आधारावर निर्माण होणाऱ्या संबंधांचा विचार वाचकाला अंतर्मुख करतो. **कथा विभाग** हा या विशेषांकाचा महत्त्वाचा भाग आहे. 'सिमेंटची जंगले आणि सुकलेली नाती', 'लिंबाचं झाड', 'मधुरा मैत्र', 'तिची गोष्ट', 'कल्पवृक्ष कन्येसाठी...' आणि 'नाळबंध' यांसारख्या कथांच्या शीर्षकांतूनच विविध भावविश्वांची जाणीव होते. शहरीकरण आणि बदलत्या जीवनशैलीमुळे मानवी संबंधांमध्ये निर्माण होणारा दुरावा, बाप-लेकीचे नाते, मैत्रीचा जिव्हाळा आणि निसर्गाशी असलेली भावनिक नाळ अशा विविध अनुभवांना कथांमधून अभिव्यक्ती मिळते. **कविता विभागात** 'आई', 'बहीण', 'आजी', 'बाबा', 'भूमी', 'माती', 'धागा नात्यांचा' आणि 'नात्यांना पडलेला तडा' अशा विषयांमधून मानवी भावविश्वाचे विविध रंग व्यक्त झाले आहेत. विशेषतः नात्यांना जोडणारा धागा आणि त्यात पडणारा तडा या दोन प्रतिमा नात्यांमधील प्रेम, विश्वास आणि दुराव्याचे वास्तव अधोरेखित करतात. बालसाहित्य विभागातील 'माझी आजी', 'रक्ताचं नाही मनाचं नातं', 'मैत्र जीवाचे' आणि 'बाबांना समजून घेताना' यांसारख्या विषयांतून पुढच्या पिढीमध्ये संवेदनशीलता आणि नात्यांविषयीची समज विकसित करण्याचा प्रयत्न दिसतो. एकूण २२४ पानांच्या या विशेषांकात मुलाखत, लेख, कथा, कविता, कादंबरी अंश, बालसाहित्य आणि ग्रंथविषयक लेखन अशा विविध साहित्यप्रकारांचा समावेश आहे. विषयाच्या अनुषंगाने केलेली विभागणी आणि विविध लेखकांच्या लेखनाला एकत्र आणण्याचा संपादकीय प्रयत्न उल्लेखनीय आहे. भविष्यात विभागनिहाय दृश्यरचना आणि अनुक्रमणिकेची अधिक सुस्पष्टता यांवर भर दिल्यास वाचनानुभव आणखी समृद्ध होऊ शकतो. या विशेषांकाचे वेगळेपण म्हणजे नात्यांचे केवळ उदात्तीकरण न करता त्यातील संघर्ष, मर्यादा आणि बदलत्या सामाजिक वास्तवाचाही विचार करणे. येथे कुटुंब आहे, पण कुटुंबाच्या पलीकडील समाजही आहे. प्रेम आहे, पण प्रेमासोबत व्यक्तिस्वातंत्र्य आणि समतेचा आग्रह आहे. त्यामुळे हा विशेषांक केवळ भावनिक वाचनापुरता मर्यादित राहत नाही, तर सामाजिक जाणिवांचा विस्तार करतो. एकंदरीत, 'कुळवाडी दिवाळी अंक २०२६'चा नाती विशेषांक हा माणूस आणि त्याच्या संबंधविश्वाचा वेध घेणारा साहित्यिक उपक्रम आहे. एखादी कविता वाचून बहिणीची आठवण यावी, एखादी कथा वाचून दुरावलेल्या मित्राशी पुन्हा संवाद साधावासा वाटावा किंवा एखादा लेख वाचून समाजातील उपेक्षित माणसांकडे पाहण्याची दृष्टी बदलावी, यातच साहित्याचे खरे यश सामावलेले असते. आजच्या तंत्रज्ञानकेंद्री, स्पर्धात्मक आणि व्यक्तिकेंद्री जीवनात माणसांमधील भावनिक अंतर वाढत असताना अशा विशेषांकाची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते. कारण नाती जपणे म्हणजे केवळ आपली माणसे जपणे नव्हे, तर माणुसकी, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी जपणे होय. शेवटी, माणसाचे आयुष्य त्याने किती संपत्ती मिळवली किंवा किती माणसांना भेटले यावरच समृद्ध होत नाही; तर त्याने किती माणसे मनापासून जोडली आणि किती नाती विश्वासाने जपली, यावरही त्याची श्रीमंती ठरते. 'कुळवाडी'चा हा विशेषांक वाचकाला नात्यांच्या याच अनवट वाटांवरून माणूसपणाचा शोध घेण्यास प्रवृत्त करतो. पाने संपतात, अक्षरे वाचून होतात; मात्र त्यातून जाग्या झालेल्या संवेदना आणि आठवणी दीर्घकाळ मनात जिवंत राहतात, हेच या विशेषांकाचे खरे यश म्हणावे लागेल.

'कुळवाडी दिवाळी अंक २०२६'
संपा: डॉ. माधव जाधव
पृष्ठ :२२४ / किंमत: ३५०/-
सायास पब्लिकेशन नांदेड.

प्रा. डॉ. व्यंकट कोरेबोईनवाड,
मराठी विभाग, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.

आरोग्य विद्यापीठात धनत्रयोदशीनिमित्त धन्वंतरी पूजन



नाशिक : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात धनत्रयोदशीनिमित्त भगवान धन्वंतरीचे मा. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू उपस्थित होते.याप्रसंगी मा. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते यांनी सांगितले की, आयुर्वेद व प्राचीन गं्रथात धन्वंतरी आरोग्याची देवता आहे. आयुर्वेद ही मानवी जीवनाला संतुलित ठेवणारी जीवनशैली आहे. निरोगी जीवनासाठी 'स्वस्थस्य स्वास्थ्य रक्षणं' या सुत्राचा अंगीकार करणे महत्त्वपूर्ण ठरत आहे. आयुर्वेदाचा समाजात मोठया प्रमाणात प्रचार व प्रसार होण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नीशील आहे. संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होणे काळाची गरज आहे. सर्वांनी निरोगी राहण्यासाठी आयुर्वेदातील तत्त्वे आचरणात आणावेत. शिक्षण, संशोधन आणि आरोग्य सेवेचा संगम साधून आयुर्वेदाला जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प करूया असे त्यांनी सांगितले. धनत्रयोदशीच्या निमित्ताने विद्यापीठात भगवान धन्वंतरीचे पूजन करण्यात आले आहे. याप्रसंगी डॉ. गीतांजली कार्ले, डॉ. प्रदीप आवळे, डॉ. स्वाती जाधव, डॉ. अनुश्री नेटके, डॉ. श्वेता तेलंग, श्री. प्रकाश पाटील, श्री. महेंद्र कोठावदे, डॉ. स्वप्नील तोरणे, श्रीमती योगिता पाटील, श्री. राजेंद्र नाकवे, डॉ. प्रशांत शिवगंुडे, श्री. महेश बिरारीस, श्री. नितीन शिंदे, श्री. संदीप ततार, श्रीमती ज्योती खांडे, मेघा बोरसे, श्री. सागर कुलकर्णी, श्री. आदेश सांगळे, श्री. लोकेश गांगुर्डे आदींसह कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.